# बेलिंगहॅमची लय कायम

## इंग्लंडचा सलामीच्या लढतीत सर्बियावर संघर्षपूर्ण विजय

**वृत्तसंस्था, ग्लेसेनकिर्चेन**

**क्लब फुटबॉलमध्ये** रेयाल माद्रिदसाठी चमकदार कामगिरी केल्यानंतर ज्युड बेलिंगहॅमने युरो अजिक्यपद स्पर्धेतही आपली लय कायम राखली आहे. बेलिंगहॅमने केलेल्या एकमेव गोलच्या जोरावर इंग्लंडने युरो स्पर्धेतील आपल्या सलामीच्या लढतीत सर्बियावर १-० असा संघर्षपूर्ण विजय नोंदवला.



इंग्लंडच्या संघाला यंदा जेतेपदासाठी प्रबळ दावेदार मानले जात आहे. गेल्या युरो स्पर्धेत इंग्लंडला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. यंदा एक पाऊल पुढे जायचे झाल्यास इंग्लंडला आपल्या कामगिरीत सुधारणा करावी लागणार असल्याचे सलामीच्या सामन्यानंतर स्पष्ट झाले आहे. उंचपुऱ्या खेळाडूंचा भरणा असलेल्या सर्बियाच्या संघाने इंग्लंडसमोर आव्हान उपस्थित केले. परंतु सर्बियाला अखेरपर्यंत गोलचे खाते उघडता आले नाही आणि इंग्लंडने निसटता विजय मिळवला.

नुकत्याच संपलेल्या क्लब फुटबॉलच्या हंगामात मध्यरक्षक असलेल्या बेलिंगहॅमने रेयाल माद्रिदसाठी उत्कृष्ट कामगिरी केली. रेयालच्या संघाने ला लिगा, स्पॅनिश सुपर चषक, चॅम्पियन्स लीग अशा तीन मोठ्या स्पर्धा जिंकल्या आणि या यशात बेलिंगहॅमची भूमिका महत्त्वाची होती. त्याने युरो स्पर्धेचीही सुरुवात दमदार केली. पूर्वार्धात बुकायो साकाच्या उजव्या बाजूने आलेल्या क्रॉसवर जोरदार हेडर मारून गोल करत बेलिंगहॅमने इंग्लंडला १३व्या मिनिटाला आघाडी मिळवून दिली. यानंतर बरोबरी साधण्याचे सर्बियाकडून बरेच प्रयत्न झाले. परंतु त्यांना यश मिळाले नाही.


> वैयक्तिक पातळीवर माझ्यासाठी या स्पर्धेची सुरुवात फारच अप्रतिम झाली आहे. या गोलमुळे माझा आत्मविश्वास दुणावला आहे. मी केलेला गोल संघाच्या विजयात निर्णायक ठरला याचा खूप आनंद आहे. – **ज्युड बेलिंगहॅम**, इंग्लंडचा मध्यरक्षक.

### युरो फुटबॉल स्पर्धेत आज...

| जॉर्जिया वि. तुर्की | पोर्तुगाल वि. चेक प्रजासत्ताक |
|---|---|
| वेळ : रात्री ९.३० वा. | वेळ : मध्यरात्री १२.३० वा. |

● थेट प्रक्षेपण : सोनी स्पोर्ट्स टेन २, ३, सोनी लिव्ह ॲप

# स्टिमॅच यांची प्रशिक्षकपदावरून हकालपट्टी



**नवी दिल्ली :** भारतीय फुटबॉल संघाच्या विश्वचषक पात्रता फेरीतील अपयशाचे तीव्र पडसाद उमटले असून अखिल भारतीय फुटबॉल महासंघाने (एआयएफएफ) इगोर स्टिमॅच यांची प्रशिक्षकपदावरून हकालपट्टी केली आहे.

स्टिमॅच यांनी २०१९ मध्ये भारतीय संघाच्या प्रशिक्षकपदाची सूत्रे स्वीकारली. गेल्या वर्षी त्यांना मुदतवाढही देण्यात आली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय संघाने काही नेत्रदीपक विजय मिळवले. मात्र, विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या तिसऱ्या पात्रता फेरीत प्रवेश करण्यात भारताला पुन्हा एकदा अपयश आले. तसेच भारताचे 'फिफा' मानांकनही घसरले. या सगळ्याचा परिणाम म्हणून 'एआयएफएफ'ने कठोर पाऊल उचलताना स्टिमॅच यांना प्रशिक्षपदावरून हटविण्याचा निर्णय सोमवारी घेतला. स्टिमॅच यांचा करार जून २०२६ पर्यंतचा होता. मात्र, मुदतीपूर्वीच त्यांना पदमुक्त करण्यात आल्याने 'एआयएफएफ'ला नुकसान भरपाई म्हणून स्टिमॅच यांना तब्बल तीन कोटी रुपये द्यावे लागणार आहे.

# रोमेनियाची चमकदार कामगिरी

**म्युनिक :** रोमेनियाने युरो अजिंक्यपद फुटबॉल स्पर्धेतील आजपर्यंतच्या आपल्या सर्वोत्तम विजयाची नोंद करताना सोमवारी झालेल्या सामन्यात युक्रेनचा ३-० असा पराभव केला. युरो स्पर्धेच्या इतिहासातील हा त्यांचा केवळ दुसरा आणि २४ वर्षांतील पहिलाच विजय ठरला. रोमेनियाच्या खेळाडूंनी आक्रमणातील आपली गुणवत्ता सिद्ध केली. दुसऱ्या सामन्यात स्लोव्हाकियाने बेल्जियमला १-० असा पराभवाचा धक्का दिला.

# बांगलादेशचा निर्णायक विजय

**किंग्जटाऊन (सेंट व्हिन्सेन्ट) :** वेगवान गोलंदाज तांझिम हसन साकिबचा (४/७) भेदक मारा, त्याला मुस्तफिझूर रहमान (३/७) आणि शाकिब अल हसन (२/९) या अनुभवी गोलंदाजांची मिळालेली साथ यामुळे बांगलादेशने आपल्या अखेरच्या साखळी सामन्यात नेपाळवर २१ धावांनी निर्णायक विजय मिळवताना ट्वेन्टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या 'अव्वल आठ' फेरीतील स्थान निश्चित केले.

नेपाळने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करताना बांगलादेशला १९.३ षटकांत १०६ धावांतच गुंडाळले होते. मात्र, नेपाळच्या फलंदाजांनी निराशा केली. त्यांचा बांगलादेशच्या गोलंदाजांसमोर निभाव लागला नाही. नेपाळचा संघ १९.२ षटकांत अवघ्या ८५ धावांत गारद झाला.

बांगलादेशकडून विशेषतः २१ वर्षीय तांझिमने उत्कृष्ट गोलंदाजी केली. त्याने चार षटकांत तब्बल २१ निर्धाव चेंडू टाकताना नेपाळच्या फलंदाजांना दडपणाखाली ठेवले. त्यापूर्वी, बांगलादेशच्या एकाही फलंदाजाला २० धावांचा टप्पा ओलांडता आला नाही. त्यांच्याकडून शाकिब अल हसनने सर्वाधिक १७ धावा केल्या.

# फर्ग्युसनची चारही षटके निर्धाव

**तारौबा :** न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज लॉकी फर्ग्युसनने ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेत सोमवारी पापुआ न्यू गिनीविरुद्धच्या सामन्यात चारही षटके निर्धाव टाकण्याची किमया साधली. अशी कामगिरी करणारा तो दुसरा गोलंदाज ठरला.

फर्ग्युसनने तीन गडीही बाद केले. न्यूझीलंडने हा सामना सात गडी राखून जिंकला. पापुआ न्यू गिनीला १९.४ षटकांत ७८ धावांत गारद केल्यावर न्यूझीलंडने १२.२ षटकांत ३ बाद ७९ धावा करत विजय नोंदवला.

# ह्युंदाईचा लवकरच 'महा-आयपीओ'

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

**वाहननिर्मिती क्षेत्रातील** ह्युंदाई मोटर इंडिया कंपनीने प्रारंभिक समभाग विक्रीसाठी (आयपीओ) भांडवली बाजार नियंत्रक सेबीकडे प्राथमिक अर्ज सादर केला आहे. कंपनी या माध्यमातून २५ हजार कोटी रुपयांचा निधी उभारणार असून, हा देशातील आजवरचा सर्वांत मोठा 'आयपीओ' ठरण्याची शक्यता आहे.

कोरियातील कंपनीच्या या उपकंपनीचा हा 'आयपीओ' मागील २० वर्षांतील कोणत्याही वाहन निर्मात्या कंपनीकडून देशाच्या भांडवली बाजाराला अजमावण्याचा पहिलाच प्रसंग असेल. या आधी मारुती सुझुकी कंपनीचा आयपीओ २००३ मध्ये आला होता. या खुल्या समभाग विक्रीनंतर ह्युंदाईचे बाजारमूल्य १.५ लाख कोटी रुपयांवर जाण्याचा अंदाज आहे. 'सेबी'कडे दाखल मसुदा प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यानंतर कंपनी हा सर्वांत मोठा आयपीओ बाजाराला धडक देण्याची शक्यता आहे. दक्षिण कोरियातील पालक कंपनीकडून ह्युंदाई मोटार इंडियातील १७.५ टक्के हिस्सा या आयपीओच्या माध्यमातून विकला जाईल. मारुती सुझुकीनंतर ह्युंदाई ही देशातील दुसऱ्या क्रमांकाची मोठी वाहननिर्मिती आणि निर्यातदार कंपनी आहे. कंपनी नवीन समभागांची विक्री आयपीओच्या माध्यमातून करणार नाही. याऐवजी सध्याचे भागधारक कंपनीतील त्यांचा समभाग हिस्सा कमी करून त्याची विक्री किरकोळ आणि संस्थात्मक गुंतवणूकदारांना आयपीओच्या माध्यमातून करतील.

### 'ई-व्ही' किंमत स्पर्धात्मकतेवर भर

**ह्युंदाई मोटर इंडिया भारतात इलेक्ट्रिक वाहनांच्या (ईव्ही) किमतीच्या आघाडीवरील स्पर्धात्मकता वाढवण्याचा विचार करत असून, त्या दिशेने सेल, बॅटरी पॅक, पॉवर इलेक्ट्रॉनिक्स आणि ड्राइव्हट्रेन यांसारख्या प्रमुख भागांसाठी स्थानिक उत्पादन क्षमता विकसित करण्यावर आणि स्थानिक पुरवठा साखळी तयार करण्यावर ती लक्ष केंद्रित करत आहे. 'आयपीओ' तारखेच्या आसपास आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तिमाहीत क्रेटा ईव्हीसह भविष्यात, प्रत्येक किंमत विभागामध्ये आदर्श ठरेल अशी चार ई-व्ही मॉडेल्स आणण्याची तिची योजना आहे.**

# यंदा १५ टक्के दराने कर्जवाढ शक्य

## स्टेट बँक अध्यक्ष खारा यांचे अनुमान

**पीटीआय, नवी दिल्ली**

**सध्याचा आर्थिक** विकास दर पाहता, देशातील सर्वात मोठी बँक असलेल्या स्टेट बँकेला चालू आर्थिक वर्षात कर्ज वितरण १४ ते १५ टक्के दराने वाढेल अशी अपेक्षा आहे, असे अध्यक्ष दिनेश कुमार खारा यांनी विश्वास व्यक्त केला.

सामान्यतः अर्थव्यवस्थेच्या वाढीचा (जीडीपी) दर आणि महागाई दर यांच्या बेरजेपेक्षा दोन ते तीन टक्के कर्ज मागणी अधिक असते. यामुळे २०२४-२५ मध्ये सुमारे १४ टक्के किंवा अधिक दराने स्टेट बँकेला वाढ साधता येईल, असे अनुमान असल्याचे खारा यांनी वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत स्पष्ट केले.

१४-१५ टक्के दराने पतपुरवठा वाढीचा दर हा बँकेकडे उपलब्ध पतपुरवठा संधींवरदेखील अवलंबून असतो. प्रत्यक्षात जोखमीला सामोरे जाण्याची क्षमता पाहता स्टेट बँकेने या गतीने वाढ साधणे समाधानकारकही ठरेल, असेही ते म्हणाले.

स्टेट बँकेच्या ठेवींमध्ये गेल्या वर्षी ११ टक्के दराने वाढ झाली आहे. बँकेने केलेल्या वाढीव एसएलआर (वैधानिक तरलता) गुंतवणुका पाहता, अपेक्षित कर्ज-ते-ठेवी गुणोत्तराला गाठण्यासाठी ठेवींवरील व्याजाचे दर वाढवण्याचा बँकेवर ताण नसेल याचीही खात्री यातून केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.







## जीआयसी हाऊसिंग फायनान्स लि.

**कॉर्पोरेट कार्यालय/मुख्यालय:** जीआयसीएचएफएल, नॅशनल इन्शुरन्स बिल्डींग, सहावा मजला, जे.टी.रोड, ॲस्टोरिया हॉटेलशेजारी, चर्चगेट, मुंबई 400020.
**टेली:** (022) 43041900, **ईमेल:** corporate@gichf.com, **वेबसाईट:** www.gichfindia.com
**नागपूर शाखा कार्यालय:** 1ए, विंग ए, तिसरा मजला, पूनम चेंबर्स, छिंदवाडा रोड, बैरामजी टाऊन, सदर, नागपूर, महाराष्ट्र, पिन - 440013 **शाखेचा ईमेल आयडी:** nagpur@gichfindia.com
**ऑफिस टेली.:** 0712-2440064 **संपर्क तपशील: इमरान अन्सारी 9021808802, विक्रांत गुप्ता 9403587862.**

### ई-लिलाव विक्री सूचना

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे **जीआयसी हाऊसिंग फायनान्स लि. (जीआयसीएचएफएल)** चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 मधील नियम 3 सह वाचण्यात येणाऱ्या अनुच्छेद 13(12) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत पुढील कर्जदार/गहाणकारांना मागणी सूचना पाठविल्या होत्या ज्यात त्यांना सदर सूचनेत नमूद थकबाकी रकमेची परतफेड करण्याचे आवाहन करण्यात आले होते. परंतु, कर्जदार/गहाणकारांनी सदर थकबाकी रकमेचा भरणा न केल्याने निम्नस्वाक्षरीकारांनी सदर नियमांमधील नियम 8 सह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(4) व अनु. 14 अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत पुढील मालमत्तांचा **प्रत्यक्ष ताबा** घेतलेला आहे.

| अ. क्र. | कर्ज फाईल क्र. / कर्जदार/ सह-कर्जदार / जामीनदाराचे नाव/शाखेचे नाव | मालमत्तेचा पत्ता / मालमत्तेचे क्षेत्रफळ (बिल्ट अप क्षेत्रफळ चौ.फू. मध्ये) | मागणी सूचना प्रकाशन दिनांक | प्रत्यक्ष ताबा दिनांक | दि. 31.05.2024 रोजी एकूण थकबाकी (मुद्दल, व्याज व इतर शुल्कांसह) (रु. मध्ये) | आरक्षित किंमत (रक्कम रु.) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **MH0410610001479 / देवेंद्र मुरलीधर ठवरे, श्री मुरलीधर रामदास ठवरे आणि श्री नरेंद्र मुरलीधर ठवरे** | ख 25/1 25/2, सीटीएस-21, पीएचईएस स्कीम, प्लॉट 16, तळ + पहिला मजला, प्लॉट 16, नारा रोड, ईडब्ल्यूएस लेआउट, विश्वास नगर, नारा रोड पोलीस स्टेशनजवळ, मौजा इंदोरा, डॉ. आंबेडकर मार्ग, नागपूर, महाराष्ट्र, पिन को - 440017 **जमिनीचे क्षेत्रफळ 597.40 चौ.फू. (बिल्ट-अप क्षेत्रफळ 559.45 चौ.फू.)** | 03-10-2019 | 29-05-2024 | 2262742/- | 2317887/- |
| 2 | **MH0410610001728 / प्रीतेश एस वाडे** | ख.क्र. 1/1/ए, आत्रेय रिजेन्सी, घर क्र. 407, चौथा मजला, प.ह.न. 46, बुद्ध विहार, आयटीआय रोडजवळ, ग्रामपंचायत वानाडोंगरी औद्योगिक परिसर, नागपूर, महाराष्ट्र, पिन कोड - 440016. **क्षेत्रफळ 925 चौ.फू. सुपर बिल्ट-अप** | 02-03-2023 | 21-08-2023 | 3445384/- | 2830500/- |
| 3 | **MH0410610001522 / श्री विजय चंद्रभान लालवाणी आणि श्री आकाश विजय लालवाणी** | ख.क्र. 167, सीटीएस 458, गंगा एन्क्लेव्ह, सदनिका क्र. एफ-5, घ.क्र. 2158, पहिला मजला, प्लॉट क्र. 310, Sht-417/91, नारी रोड, कामगार नगर चौक, इंदोरा हाऊसिंग अको. स्कीम, नारी टेलिफोन एक्स्चेंजजवळ, मौजा नारी, उप्पलवाडी, नागपूर, महाराष्ट्र, पिन कोड - 440026. **क्षेत्रफळ सुमारे 877.67 चौ.फू. सुपर बिल्ट-अप.** | 25-06-2021 | 28-05-2024 | 3270186/- | 1997258/- |
| 4 | **MH0410110001527 / अमित मदन शॉ आणि लीना अमित शॉ** | ख.क्र. 24/2, प.ह.न. 38, जयंती नगरी 2, विंग बी, सदनिका क्र. 404, चौथा मजला, बेसा, रुद्र गौरव कॉम्प्लेक्सजवळ, मौजा बेसा, पिपळा, नागपूर, महाराष्ट्र, पिन कोड - 440034. **क्षेत्रफळ 1100 चौ.फू. बिल्ट-अप.** | 23-06-2022 | 12-04-2023 | 3703276/- | 3168000/- |
| 5 | **MH0410610001557 / श्री अमित उत्तमराव गेडाम आणि श्रीमती वैशाली अमित गेडाम** | ख.क्र. 82, 83, ट्रीलाईन अपा. क्र. 5, सदनिका क्र. सी-203, दुसरा मजला, प्लॉट क्र. आर-1-24, हुडकेश्वर रोड, एन्सारा मेट्रोपार्क फे-1, एन्सारा मेट्रोपार्क, मौजा पिपळा, नागपूर, महाराष्ट्र, पिन कोड - 440034. **क्षेत्रफळ 1198 चौ.फू. बिल्ट-अप (वापरयोग्य क्षेत्रफळ)** | 25-06-2021 | 21-08-2023 | 7733254/- | 4600320/- |
| 6 | **MH0410610001458 / देवेंद्र विष्णू बेलगामवार** | ग्रीन एमराल्ड-3, ग्रीन सिटी, सदनिका क्र. 204, विंग-बी, प्लॉट क्र. ख.क्र. 5/1, शंकरपूर रोड, ग्रीन स्पेस इन्फ्रा, मिहान कॉलनीच्या मागे, मौजा गोटाळ पांजरी, नरसाळा, नागपूर, महाराष्ट्र, पिन कोड - 440034, **क्षेत्रफळ सुमारे 667 बिल्ट-अप.** | 06-09-2018 | 25-02-2020 | 3105326/- | 1494747/- |
| 7 | **MH0410110001588 / श्री सोपान नामदेव खडसे आणि श्रीमती शिल्पा सोपान खडसे** | ख.क्र. 5/1, प.ह.न. 38/ए, ग्रीन रिव्हीएरा-2, ग्रीन सिटी, सदनिका क्र. 202, दुसरा मजला, विंग-बी, शंकरपूर रोड, ग्रीन स्पेस इन्फ्रा-1, मिहान कॉलनीच्या मागे, मौजा गोटाळ पांजरी, नरसाळा, नागपूर, महाराष्ट्र, पिन कोड - 440034. **क्षेत्रफळ 689.49 चौ.फू. सुपर बिल्ट-अप.** | 25-06-2021 | 30-05-2024 | 2935184/- | 1960975/- |

**ई-लिलावाचा दिनांक व वेळः दि. 10-07-2024 रोजी (https://www.bankauctions.in) या वेब-पोर्टलवर दु. 3.00 ते 4.00 वाजेपर्यंत प्रत्येकी 5 मिनिटांच्या अमर्याद कालविस्तारांसह.**

**ऑनलाईन पद्धतीने किंवा वर नमूद जीआयसीएचएफ कार्यालयात बयाणा रक्कम व केवायसीसह विहित निविदा प्रपत्रातील निविदा/मोहरबंद बोली सादर करण्याचा शेवटचा दिनांक आहे 08-07-2024.**

वर नमूद मत्ता/ मालमत्तांच्या ई-लिलावाद्वारे (सर्फेसी अधिनियम, 2002 आणि त्याअंतर्गत असलेल्या नियमांमधील अटी व शर्तींच्या अनुषंगाने) विक्रीसाठी सदर जाहीर सूचनेशिवाय जीआयसीएचएफएल हे सदर मालमत्तांची **"जशी आहे जेथे आहे" आणि "जशी आहे जे काही आहे"** तत्त्वावर खरेदी करण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने किंवा मोहरबंद लिफाफ्यांमधील प्रस्ताव आमंत्रित करत आहेत.

**लिलावाद्वारे विक्रीच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे आहेतः**

1. **ई-लिलाव हा "जशी आहे जेथे आहे" आणि "जशी आहे जे काही आहे", "तेथे जे काही आहे" आणि "उपाय नाही" तत्त्वावर "ऑनलाईन" घेण्यात येणार आहे. हा ई-लिलाव जीआयसीएचएफ चे मान्यताप्राप्त ई-लिलाव सेवा पुरवठादार "मे. 4क्लोजर" यांचेद्वारे राबविण्यात येईल.**
2. **इच्छुक बोलीदारांनी https://bankauctions.in/ या पोर्टलवर आपले नाव नोंदवावे आणि आपला युजर आयडी व पासवर्ड निःशुल्क प्राप्त करावा. संभाव्य बोलीदार सेवा पुरवठादार मे. 4क्लोजर, अमीरपेट, हैदराबाद यांचेकडून ई-लिलावाचे ऑनलाईन प्रशिक्षण प्राप्त करू शकतात. लँड लाईनः 040-23736405 आणि +91-8142000062/66, आणि prakash@bankauctions.in, श्री अरिजित, क्र. 8142000725, मेल आयडी: arijit@bankauctions.in. इमरान अन्सारी 9021808802, विक्रांत गुप्ता 9403587862. मेल आयडी: nagpur@gichfindia.com**
3. सदर ई-लिलाव विक्री ही सर्फेसी अधिनियम/ नियम 2002 मध्ये विहित करण्यात आलेल्या अटी व शर्तींच्या आणि खाली / वेबसाईटवर नमूद करण्यात आलेल्या अटी व शर्तींच्या तसेच इच्छुक / सहभागी होणाऱ्या बोलीदारांनी सादर केलेल्या प्रस्ताव / बोली दस्तावेजामधील अटींच्या अधीन असेल.
4. ऑनलाईन ई-लिलावात सहभागी होण्यासाठी प्रत्येक बोलीदाराकडे स्वतःचा ईमेल ॲड्रेस असणे आवश्यक आहे.
5. **एकदा इच्छुक बोलीदाराने** जीआयसीएचएफ च्या प्राधिकृत अधिकाऱ्यासमक्ष पात्र निविदाकार म्हणून औपचारिक नोंदणी केली, की त्याला दस्तावेज सादर करून ई-लिलाव बोली मंचाच्या माध्यमातून सहभागी होण्यात आपल्याला रस आहे हे दर्शवावे लागेल. ई-लिलाव सेवा पुरवठादाराकडून आपला लॉगीन आयडी व पासवर्ड प्राप्त करून घेण्याची जबाबदारी सर्वस्वी निविदाकाराची / ऑनलाईन बोलीदाराची असेल.
6. वर नमूद मालमत्तांची विक्री वर नमूद आरक्षित किमतीपेक्षा कमी रकमेस करण्यात येणार नाही.
7. **इच्छुक बोलीदारांनी वर नमूद त्या-त्या आरक्षित किमतीच्या 10% एवढी बयाणा रक्कम जीआयसी हाऊसिंग फायनान्स लि. यांचे नावे काढलेल्या डीडी/आरटीजीएस/एनईएफटी च्या माध्यमातून सादर करावी, तपशील याप्रमाणे आहेः बँकेचे नावः युनियन बँक ऑफ इंडिया, खाते क्र. 005111010000039 - खात्याचे नावः जीआयसी हाऊसिंग फायनान्स लि. लिलाव खाते, शाखेचे नावः एलसीबी, फोर्ट, पत्ताः यूबीआय, 239 बॅकबे रेक्लेमेशन, नरीमन पॉईन्ट, मुंबई, महाराष्ट्र - 400021, आयएफएससी कोड – UBIN0800511.**
8. यशस्वी बोलीदारांच्या बाबतीत सदर बयाणा रक्कम समायोजित करण्यात येईल, अन्यथा परत करण्यात येईल. सदर बयाणा रकमेवर व्याज देण्यात येणार नाही.
9. वर नमूद बयाणा रकमेसह प्रस्ताव पॅन कार्ड व पत्त्याच्या पुराव्यासह बयाणा रक्कम व केवायसी दस्तावेजांच्या स्कॅन केलेल्या प्रतीसह सेवा पुरवठादाराकडे https://bankauctions.in/ या पोर्टलच्या माध्यमातून **"ऑनलाईन"** सादर करता येईल किंवा किंवा बोली प्रपत्र, बयाणा रक्कम आणि केवायसी दस्तावेज असलेला मोहरबंद लिफाफा सादर करून सादर करता येईल आणि हा लिफाफा **जीआयसी हाऊसिंग फायनान्स लि.** च्या संबंधित शाखा कार्यालयात पोचता करावा.
10. की, निविदा उघडण्यात आल्यानंतर, किमान आरक्षित किमतीएवढ्या रकमेच्या बोली सादर करणारया इच्छुक बोलीदारांना प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या परवानगीने त्यांच्या बोली रकमेत वाढ करण्याची संधी देण्यात येईल.
11. प्राधिकृत अधिकाऱ्यांनी विक्रीच्या संदर्भात प्रस्ताव स्वीकारल्यानंतर यशस्वी बोलीदारास ताबडतोब तोवर भरलेली बयाणा रक्कम समायोजित करून विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम जमा करावी लागेल, अन्यथा बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल. विक्री किमतीपैकी उर्वरित 75% रकमेचा भरणा प्राधिकृत अधिकाऱ्यांनी परवानगी दिल्यास विक्रीची निश्चिती होण्याच्या दिनांकापासून 15 दिवसांचे आत करावा लागेल. विहित कालावधीत उर्वरित रक्कम जमा करण्यात न आल्यास तोवर भरलेली रक्कम जप्त करण्यात येईल. प्राधिकृत अधिकाऱ्यांना या संदर्भात यशस्वी बोलीदारास ही रक्कम जप्त करण्यात येणार असल्याबाबत आणखी कुठलीही सूचना देण्याची गरज नाही.
12. बोलीदारांवर हे "खरेदीदाराने सावध असावे" या तत्त्व लागू असेल आणि त्यांनी फर्म किंवा अनामत मत्तेवरील कोणतेही बोजे, वैधानिक दायित्वे, मालमत्ता कर, प्राप्ती कर, सीमा शुल्क, कामगार थकबाकी, वीज व मेंटेनन्सची थकबाकी इ. बाबत स्वतः चौकशी करून खात्री करून घ्यावी. सर्व देणी म्हणजे महापालिका कर, मेंटेनन्स / सोसायटीची शुल्के, पाणी शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. चा तसेच विक्री किमतीव्यतिरिक्त संबंधित मालमत्तांशी संबंधित सर्व देण्यांसह इतर सर्व आनुषंगिक शुल्के, खर्च इ. चा भरणा यशस्वी बोलीदारास करावा लागेल.
13. यशस्वी बोलीदारास अनामत मत्ता आपल्या नावे करून घेण्यासाठी लागणारे नोंदणी शुल्क, मुद्रांक शुल्क, कर, किंवा इतर कोणतीही देणी यांसारख्या विक्री प्रमाणपत्रावर देय शुल्काचा भरणा करावा लागेल.
14. विक्री प्रमाणपत्र हे संपूर्ण विक्री रक्कम प्राप्त झाल्यावरच केवळ यशस्वी बोलीदाराच्या नावेच जारी करण्यात येईल.
15. याद्वारे कर्जदार, गहाणकार आणि जामीनदारास सूचित करण्यात येते की ते ई-लिलाव विक्रीच्या अटी व शर्तींनुसार वर नमूद मालमत्तेच्या खरेदीसाठी इच्छुक खरेदीदारांना सोबत आणू शकतात.
16. विनंती केल्यास प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या सोयीनुसार वर नमूद मालमत्तेची पाहणी करता येईल.
17. प्राधिकृत अधिकारी सर्वोच्च प्रस्ताव किंवा कोणताही किंवा सर्वच प्रस्ताव स्वीकारण्यास बांधील नसून कोणतेही कारण न देता कोणतीही किंवा सर्वच निविदा स्वीकारण्याचा किंवा फेटाळण्याचा अधिकार ते राखून ठेवतात.
18. **वर नमूद मालमत्तांवर प्रलंबित असलेल्या कोणत्याही दायित्वांसाठी जीआयसीएचएफएल जबाबदार नाहीत. मालमत्तेची विक्री "जशी आहे जेथे आहे", "जशी आहे जे काही आहे", "तेथे जे काही आहे" आणि "कोणताही उपाय नाही" तत्त्वावर करण्यात येईल.**

**सर्फेसी अधिनियम, 2002 अंतर्गत 15 दिवसांची वैधानिक विक्री सूचना**

**विक्रीच्या अटी व शर्तींच्या संपूर्ण तपशीलासाठी आणि मालमत्तांच्या वर्णनासाठी कृपया मान्यताप्राप्त ई-लिलाव सेवा पुरवठादार "मे.4क्लोजर" यांची https://www.bankauctions.in ही वेबसाईट पाहावी.**

**दिनांकः 18.06.2024**
**स्थानः नागपूर.**

**जीआयसी हाऊसिंग फायनान्स लि. करिता,**
**स्वा/-**
**प्राधिकृत अधिकारी**







हे पत्र **मुद्रक आणि प्रकाशक विरेंद्र विद्याधर रानडे** यांनी मालक, दि इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - दि इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड), यांच्यासाठी लोकमत, प्लॉट नं. १९२, २०७ आणि २०८, एमआयडीसी इंडस्ट्रियल एरिया, बुटीबोरी, नागपूर-४४११०८ येथे छापून प्लॉट. नं. ३८, ॲडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, अंबाझरी ले-आऊट, अंबाझरी, नागपूर-४४००१० येथे प्रसिद्ध केले. दूरध्वनी क्रमांक : २२३०४२१, २२३६८९७, फॅक्स क्रमांक : २२३६९८६. **लोकसत्ता मुंबई कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१. दूरध्वनी क्रमांक : २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : २२८२२१८७. **महापे कार्यालय :** प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **पुणे कार्यालय :** एक्स्प्रेस हाऊस, प्लॉट नं. १२०५/२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४. दूरध्वनी : ०२०-६७२४१०००, फॅक्स : ०२०६७२४११४७. ■ **अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका** ■ **कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार** ■ **संपादक : गिरीश कुबेर** ■ **निवासी संपादक : देवेंद्र गावंडे*** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) Loksatta, RNI. No. 54743/92, Dated 30-4-92.
© दि. इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.